# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ३०/०१/२०२५ (गुरूवार)

---

### उभ्या ट्रक चे टायर चोरणाऱ्या आरोपीस अटक. ८० लाख ४० हजाराचा मुददेमाल जप्त
### मौदा पोलसांची कारवाई

पोलीस स्टेशन मौदा :—दिनांक २१/०१/२०२५ रोजी फिर्यादी नामे उमेश जयकिशनजी मुंदडा, वय ५० वर्षे, रा. रामदासपेठ, नागपुर यांनी पोलीस ठाणे, मौदा येथे येवुन रिपोर्ट दिली की, दि. १८/०१/२०२५ ते दिनांक २०/०१/२०२५ चे दरम्याण फिर्यादीचे आयसर कंपनीतील परीसरात उभ्या असलेल्या ५ आयसर गाडीचे एकुण २४ टायर डिक्स् सह कि. ४,५०,०००/— रु. चा माल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेला.सदर रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन मौदा येथे कलम ३०३(२) भा.न्या.स. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचे गांर्भिय लक्षात घेता मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने पोलीस निरीक्षक श्री सारीन दुर्गे, पोलीस ठाणे मौदा यांनी गुन्हे प्रगटीकरण पथकास आदेश देवुन त्वरीत अज्ञात आरोपीचा शोध घेण्याकरीता रवाना केले असता तपास पथकाने तांत्रीक पद्धतीने तपास केला असता गुन्हयातील आरोपीतांनी गुन्हा करण्यासाठी १) अशोक लेलँन्ड कंपनीचा ट्रक क्र. एम एच १२ के पी ५९२५, २) अशोक लेलँन्ड कंपनीचा ट्रक क्र. एम एच ४४ यु ७१९९, ३) फोर्स कंपनीची क्रुझर गाडी क्र. एमएच २५ आर ०१९३ चा वापर केल्याचे निष्पन्न झाल्याने सदरहु वाहन मालक व वाहनाचा शोध घेणेकामी पथकास धाराशिव जिल्हात रवाना करण्यात आले होते.तपास पथकाने वाहनाचे शोध घेतला असता तिन्ही वाहने मिळुन आले. तसेच गुन्ह्यात सहभागी असलेले आरोपी नामे गणेश नारायण शिंदे, वय ३८ वर्षे, रा. तेरखेडा, ता. वाशी, जि. धाराशिव यास दिनांक २९/०१/२०२५ रोजी अटक करण्यात आलेली असुन पोलीस पाहीजे आरोपीतांचा शोध घेत आहे. आरोपीचे ताब्यातुन गुन्हयात वापरेली वाहने व ईतर मुद्देमाल असा **एकुण ८०,४०,००० /— रुपयाचा** मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.




## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस केले अटक

**पोलीस स्टेशन बेला:-** पोलीस स्टेशन बेला अंतर्गत दिनांक २८/०१/२५ रोजी दरम्यान फिर्यादी हरी कंटीराम शडमाके, वय ६५ वर्ष रा. झोपडी कोहडा ता उमरेड जिल्हा नागपुर यांनी रिपोर्ट दिली की फिर्यादीचा मुलगा नरेश शडमाके हा त्याच्या पुर्तीसाखर कारखाना समोरील चिकनचे दुकानात दोन ग्राहकांना चिकन कापुन देत असातांना आरोपी नामे रामगोपाल मायाबाबा मोरधरे रा खुर्सापार हा सुध्दा त्याच्या बाजुलाच त्याचे चिकनचे दुकानात हजर होता. आरोपीने फिर्यादीच्या मुलाच्या दुकानातील ग्राहकाला त्याच्या दुकानात बोलाविले असता फिर्यादीच्या मुलाने त्याला ग्राहकांना का बोलवत आहे असे विचारल्यावर आरोपीने फिर्यादीच्या मुलाला शिवीगाळ केली त्यावर पुन्हा फिर्यादीचा मुलगा नरेश याने तु शिवीगाळ का करत आहे असे विचारल्यावर आरोपी हा त्याचे चिकन कापण्याचे लोखंडी सत्तुर घेवुन नरेश च्या दुकानात धावत येवुन नरेश याच्या मानेवर व खांदयावर जीवघेणा हल्ला करून पळुन गेला.फिर्यादीच्या अशा रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन बेला येथे आरोपी रामगोपाल मायाबाबा मोरधरे रा खुर्सापार याच्या विरूध्द कलम १०९(१), ३५२ भान्यासं सह कलम ३(२) (५) अनु.जाती.जमाती अत्या. प्रति. अधिनियम गुन्हा नोंद करण्यात आाला आहे.

बेला पोलीसांनी गुप्त बातमीदारांच्या खबरेवरून सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे रामगोपाल मायाबाबा मोरधरे वय ४४ वर्षे रा खुर्सापार याला वडगाव धरण परीसरातुन ताब्यात घेवुन आज रोजी आरोपीला अटक करण्यात आली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**